# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**
**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २१**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- १,५४,९९,२७,४६,०००/-**<br>**श्रीमती ज्योती गायकवाड** |
| (१) | २६५ | १०० | सांताक्रुझ (पूर्व) येथील व्ही.एन देसाई महानगरपालिका रुगालयाची प्रचंड दुरावस्था झालेली असणे, तसेच अतिदक्षता विभागामध्ये बेडची संख्या अत्यंत कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होत असणे, रुग्णालयात सोयी-सुविधा, अदययावत उपकरणे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता,असल्यास, रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजय चौधरी** |
| (२) | ४१४ | १० | मुंबईतील परळ येथील महात्मागांधी स्मारक रुग्णालयाची इमारत राज्य कामगार विमा मंडळ अंतर्गत बांधण्यात आलेली असणे, सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी कर्मचा-यांची पदे भरण्यात आलेली असणे, तथापी सदर रुग्णालयामध्ये दैनंदिन ५-१० रुग्णच उपचारासाठी येत असणे, त्यामुळे रुग्णालयाची वास्तू वापरा अभावी पडून असणे, परिणामी सदर रुग्णालयावर अनावश्यक खर्च होणे, सदर रुग्णालय शासनाच्या किंवा मुंबई महानगरपालिकेच्या मार्फत चालविण्यात आल्यास शासनाच्या/महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयावरील ताण कमी होण्यास मदत होणार असणे, त्यामुळे सदर रुग्णालय राज्य शासनाने ताब्यात घेऊन राज्य शासन किंवा मुंबई महानगरपालिकेमार्फत रुग्णालयाची सेवा देण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १४३ | १०० | मौजे आंबव( ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) या गावात व आजूबाजूच्या निव्हे, सांगोळे, किरधाडी, वाशिम, कर्ली या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याने येथील गोरगरीब ग्रामस्थांना देवरूख या तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | याकरिता तेथील ग्रामस्थांनी दि.६.३.२०२५ रोजी मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री यांना लेखी निवेदन देण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय देरकर** |
| (४) | ६२४ | १०० | वणी येथील 350 पेक्षा जास्त खेडे जुळले असून वणी शहर व ग्रामीण भागातील लोकसंख्या अंदाजे 3 लक्ष पेक्षा जास्त आहे. वणी उपजिल्हा रुग्णालय सद्य:स्थित 50 खाट क्षमतेचे असल्याने येथे रुग्णांना सेवा देणे कठीण होत आहे. किंबहुना रुग्णांना उपचाराअभावी इतर जिल्हात जावे लागत आहे. वणी मतदार संघात कोळसा खाणी व दगडाच्या खाणी असून या खाणीमध्ये इतर जिल्हातीलही कामगार आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता वणी उपजिल्हा रुग्णालयाच्या खाटांची (बेड) क्षमता वाढविणे गरजेचे आहे. वणी उपजिल्हा रुग्णालयाची खाटांची क्षमता वाढवून ५० वरुन १०० करण्याची आवश्यकता.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (५) | १६८ | १०० | जोगेश्वरी पूर्व येथील हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रुग्णालया सोयी-सुविधांचा असलेला अभाव, रुग्णालयाकरिता शासनाकडून येत असलेल्या निधीचा वापर होत नसल्याचेही निदर्शनास येणे, उक्त रुग्णालयात डॉक्टर, अदयावत मशिन,औषधासह अन्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याने उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांना असंख्य समसयांना सामोरे जावे लागत असणे, शासनाने तातडीने लक्ष घालून डॉक्टर, अदयावत मशिन, औषधे आदिसह सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (६) | ६३४ | १० | मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सिटी स्कॅन मशीन एम.आर.आय मशीन बंद असणे, रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थियेटर मागील काही काळापासून बंद असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, रुग्णालयात सी टी स्कॅन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या तारखा देण्यात येणे , त्यामुळे रुग्णांचे वेळेत उपचार न होणे, महापलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ६५६ | १० | मौजे वाटूळ ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय मंजूर करण्यास विशेष बाब म्हणून दिनांक ११ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येणे, परंतू याबाबत शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दिरंगाई होत असल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर, चिपळूण, गुहागर, दापोली व इतर तालुकयातील रुग्णांना औषधोपचारासाठी पनवेल किंवा मुंबई येथील ३०० कि.मी. प्रवास करुन उपचार घ्यावे लागत असणे, मौजे वाटूळ ता. राजापूर येथील १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालय तातडीने उभारुन तेथील आजूबाजूच्या तालुक्यातील नागरिकांना उपचार घेणे सोईचे होण्यासाठी शासनाने स्वत: अथवा इच्छूक खाजगी समाजसेवी संस्थेकडून विहित वेळेत रुग्णालय उभारण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (८) | ५८३ | १०० | सध्या कर्करोगाचे प्रमाण प्रचंड वाढलेले असून शहरातील अनेक छोट्या व मोठ्या रुग्णालयांमध्ये कॅन्सरचे रुग्ण उपचार घेत असणे, कर्करोगावर वैद्यकीय उपचाराकरिता प्रचंड खर्च येत असून त्यामुळे कुटुंब आर्थिक अडचणीत येणे, गोरगरीब नागरिकांसाठी कर्करोगावर उपचार करण्यासाठी शहरांमध्ये मुद्द्यावत रुग्णालय सुरू करण्यात आवश्यक याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांची सातत्याने मागणी होत असणे, सबब पुणे शहरात तातडीने कर्करोगावर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयाची स्थापना करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (९) | ६३९ | १० | भिवापूर येथे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त आहे त्यात ३० खाटांच मंजूर आहे,तसेच सदर ठिकाणी 20 खाटा ट्रॉमा सेंटर आहे परंतु तेथील कर्मचारी राहत असलेली इमारत अत्यंत जुनी असून ती जीर्ण झाली आहे त्यामुळे त्या ठिकाणी वास्तव्यास असलेले कर्मचारी व त्यांची कुटुंबीय यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे त्यामुळे सध्याची जुनी इमारत,/घरे पाडून त्याच ठिकाणी नवीन कर्मचारी वसाहत स्थापन करावी यासाठीचा अंदाज पत्रके तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे,परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे,त्यामुळे भिवापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६४० | १० | उमरेड तालुक्यातील बेला येथिल प्राथमिक आरोग्य केंद्र ३० खाटाचे ग्रामीण रुग्णालय रूपांतरित झाले आहे परंतु सदर इमारत बांधण्यासाठी इमारत बांधकाम निधी साठी त्या बाबतचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आले आहे,परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे,त्यामुळे उमरेड तालुक्यातील बेला येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांचा प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात निधी करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६४१ | १० | उमरेड येथे ग्रामीण रुग्णालयाला नुकताच उपजिल्हा रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे त्यात ५० खाटांचे रूपांतरित झाले आहे,तसेच त्या बाबतचे अंदाज पत्रके तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे,परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे,त्यामुळे उमरेड येथील उपजिल्हा रुग्णालय येथील प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात शासनाने तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१२) | ४०६ | १० | राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्याच्या ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये १०७७३ अंशकालीन स्त्री परीचर असून त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्यात ३७६ स्त्री परीचर काम करीत असणे, या अशंकालीन स्त्री परीचर यांना रुपये २९०० हस्तांतर केंद्र हिस्सा व १०० अभिकरण राज्य हिस्सा असे एकूण रूपये ३००० मानधन देण्यात येणे, या अल्प मानधनावर अंशकालीन स्त्री परीचर काम करित असणे, अंशकालीन स्त्री परीचर हे पद अर्धवळ जरी असेल तरी त्यांना रोज पुर्ण दिवस काम करावे लागत असतांना सुध्दा यांच्या मानधनात वाढ होत नसणे, त्यामुळे अशंकालीन स्त्री परीचर संघटना जिल्हा शाखा गडचिरोली यांनी लोकप्रतिनिधीसह सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन देणे, या निवेदनात अंशकालीन स्त्री परीचर यांना किमान वेतन रूपये २१००० देण्यात यावे, अंशकालीन या शब्दामध्ये बदल करून बहुउदेशिय स्त्री परीचर असे संबोधण्यात यावे, प्रसुत्ती रजा मंजूर करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात जेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावे कर्तव्यावर मृत्यू झाल्यास महिलांना सहायता निधी मंजूर करण्यात यावे या प्रमुख्य मागण्याचे निवेदण देण्यात येणे, या महत्वाच्या व ज्वलंत मागण्या अजुनही मान्य करण्यात आलेले नसल्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तीव्र असंतोष परिणामी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४१५ | १० | चंद्रपूर जिल्हयात चंद्रपूर येथे फक्त एकच महिला व बाल रूग्णालय असून या रूग्णालयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यासह जिल्हयातील इतरही तालुक्यातील मोठय प्रमाणात महिला व बाल रूग्ण जात असणे, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यापासून चंद्रपूरचे अंतर लांब असल्याने अति गंभीर आजारी रूग्ण वेळेवर रुग्णालयात पोहचण्याआधी वाटेतच मृत्यू होत असणे, या कारणास्तव चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे १०० खाटांचे महिला व बाल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रुग्णालय सूरू करण्याची मागणी या तालुक्यातील हजारो नागरिकांनी करणे, हे रुग्णालय सुरू झाल्यास या रुग्णालयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड, सावली या तालुक्यासह गडचिरोली जिल्हयातील आरमोरी, वडसा, कुरखेडा या तालुक्यातील नागरिकांना सुध्दा फायदा होणार असणे, बोडेगावे परिसरात सर्वे नंबर ४११ ही सरकारी जागा असून याठिकाणी ब्रम्हपूरी येथे १०० खाटाचे महिला व बाल रुग्णालयाची निर्मिती होऊ शकत असल्याने लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी मागणी करणे, ब्रम्हपूरी येथे १०० खाटाचे महिला व बाल रुग्णालय मंजुर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१४) | ४४२ | १० | मुंबई उपनगरात मालाड (पश्चिम), भूमी पार्क, जनकल्याण नगर येथे शासनाचे सामान्य रुग्णालय असून या ठिकाणी आरोग्य सेवा संचालकांनी २०० खाटांच्या नवीन, आधुनिक व उत्तम श्रेणी दर्जेचा रुग्णालयाचा प्रस्ताव तयार केला असणे, सदर प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वर्ष २०२३ ला पाठवण्यात आला असणे, सादर रुग्णालयाच्या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे व तीन वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित असणे, आरोग्य सेवा संचालकांनी, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई यांनी शासनाला वारंवार कळविले असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीने वारंवार पत्राद्वारे कळविण्यात आले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ४४३ | १० | सी.टी.एस.३५२५ मालवणी गांव, कलाविद्या महाविद्यालया जवळ, म्हाडा लेआउट, मालाड(पश्चिम)मुंबई येथील जागा सार्वजनिक आरोग्य केंद्र व प्रसूती गृहासाठी शासनाने आरक्षित केली असणे, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ मधील कलम २२ आणि ३७ अन्वये रुग्णांलयासाठी आरक्षित असणे, याकडे शासनाने दुर्लक्ष केले असणे, त्याठिकाणी सार्वजनिक रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ४४४ | १० | हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना, अंबोजवाडी व गेट नंबर-७ तसेच जुलीसवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई या तिन्ही ठिकाणी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, उपरोक्त परिसर झोपडपट्टी मुक्त असणे, त्याठिकाणी दुसरे दवाखाने नसणे, रहिवाशांना प्राथमिक औषधोपचार देण्याच्या दृष्टीने ३ ठिकाणी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१७) | ४४५ | १० | मुंबई उपनगर मालाड (पश्चिम) जनकल्याण नगर, भूमि पार्क येथे शासनाचे सामान्य रुग्णालय मालवणी असणे, सदरच्या ठिकाणी शासनाने रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी रुग्णांना अत्यावश्यक सेवा देता यावी, यासाठी रुग्णालयाच्या आवारात अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता निवासस्थानाची इमारत शासनाने बांधली असणे, मात्र सदरची इमारत कर्मचाऱ्यांना निवासस्थानासाठी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मात्र शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व उपाययोजना. |
| (१८) | ४४६ | १० | सिंधुदूर्ग जिल्ह्यात सिंधुदुर्गनगरी येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, आरोग्यवर्धिनी केंद्रे अशी मोठी आरोग्य यंत्रणा असून वैद्यकीय अधिकारी, अन्य कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणातील पदे रिक्त असणे, शासनाकडून आवश्यक साधनसामुग्रीचा पुरवठा न होणे, औषधांचा कमी पुरवठा, नादुरुस्त रुग्णवाहिका अशा अनेक समस्यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा त्रस्त असणे, परिणामी, दरवर्षी लक्षावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही नागरिकांना पुरेशी आरोग्य सुविधा न मिळणे, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयांमधील वर्ग-1 व वर्ग-२ च्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या जागा प्राधान्याने भरणे, जिल्हयातील विविध रुग्णालयात रिक्त असलेल्या परिचारिका व अन्य पॅरामेडिकल कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे सिंधुदूर्ग जिल्हयातील अंशकालीन स्त्री परिचर, बालवाडीताई यांना प्रशिक्षण देवून त्यांच्या पदामधून भरणे, तसेच, शासनाची अतिशय उपयुक्त, लोकप्रिय झालेली महात्मा फुले जन आरोग्य योजना ग्रामपातळीवर गावातील ग्रामसेवक, आरोग्य सेविका, तलाठी यांच्या मध्यमातून ग्रामपातळीपर्यन्त पोहोचविण्यात यावी अशी ‘सिंधुदुर्ग आरोग्य मिशन’ या सामाजिक संस्थेची मागणी असणे, सिंधुदूर्ग जिल्हयासाठी बीव्हीजी खाजगी कंपनीकडून १०८ रुग्णवाहिकांची पुरविण्यांत येणारी सेवा ठीसाळ, मनमानी, बेभरवश्याची असणे, रुग्णवाहिकांवर काम करणारे वैद्यकीय अधिकारी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ४४८ | १० | मुंबईतील मोठ्या शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी आपल्या राज्यातील व इतर राज्यातील रुग्ण येत असल्यामुळे मुंबईतील मोठ्या शासकीय रुग्णालयांवर अधिक ताण असणे, त्यामुळे रुग्णालयांत येणारे रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक यांना राहण्यास संकुले, स्नान गृहे व सुलभ शौचालये यांच्या सारख्या मूलभूत सोई- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सुविधेची पुरेशी व्यवस्था नसल्याने रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणे, त्यामुळे शासनाने मुंबईतील मोठ्या शासकीय रुग्णालयांत उपचारासाठी पर राज्यातून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यासाठी संकुलांची व्यवस्था तसेच स्नानगृहे व सुलभ शौचलयांची पुरेशी व्यवस्था करुन देणे गरजेचे असणे, मात्र अशा कोणत्याही सोयी-सुविधा आज मुंबईतील मोठ्या रुग्णालयांच्या आवारात उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आलेली असून लवकरात लवकर या मूलभूत सोयी-सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ४५० | १० | सन २०१८ मध्ये केंद्र सरकारने टिबी मुक्त भारताची घोषणा केली असून वर्ष २०२५ पर्यंत या आजारचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले असणे, त्याला अनुसरून महाराष्ट्र सरकारनेही हे उद्दिष्ट ठेवले असणे, असे असताना आज मुंबई महानगर पालिका संचलित शिवडीचे क्षय (टिबी) रुग्णालय मृत्यूचे केंद्र बनले असून गेल्या ४१ महिन्यात ‘ड्रग सेंसेटीव्ह’ आणि ‘ड्रग रेझीस्टंट’, टिबीचे एकूण ३ हजार १८५ रुग्णांचा मृत्यू झालेला असणे, शिवडीच्या या टिबी रुग्णालयात दररोज सरासरी दोन ते तीन रुग्ण दगावत असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, क्षय रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे रुग्णालय प्रशासनाकडून संवेदनशील रुग्णांवर उपचार करण्यात कसूर होत असून त्यामुळे मृत्यूची संख्या वाढत जाणे, यावरून क्षय रोगाचा प्रसार किती वेगाने होत आहे याची कल्पना येणे, रुग्णांची अवस्था गंभीर झाल्या नंतर उपचारासाठी रुग्णालयात दाखल होणे, या आजारकडे रुग्णांचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शिवडी येथील टिबी रुग्णालयावर येत असलेला वाढता ताण, क्षय आजाराबाबत सर्वसामान्य जनतेमध्ये जाणीव जागृती करण्याची मोहीम राबविण्याची गरज, तसेच क्षय रुग्णांवर उपचार करण्यसाठी मुंबईत किमान आणखी एक क्षय रुग्णालय उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ४५१ | १० | मुंबईतील, झोपडपट्टी भागात राहणाऱ्या गरिबांना त्यांच्या घरापासून अवघ्या १० मिनिटाच्या अंतरावर दर्जेदार आणि मोफत उपचार सुविधा“हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, “आपला दवाखाना” ही एक उत्तम योजना मागील सरकारने सुरू करणे, या योजने अंतर्गत क्ष किरण, सोनोग्राफी, ईसीजी, सिटी स्कॅन, एम आर आय, मॅमो ग्राफी यासह १४७ चांचण्यांची सुविधा नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात येणे, या योजने अंतर्गत शहरातील २५० ठिकाणी हे दवाखाने रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरू ठेवल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्याचा लाभ मिळणे, मात्र सद्य स्थितीत “हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, आपला दवाखाना” मध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या चाचण्या बंद करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सर्वसामान्य गरीब रुग्णांमध्ये सद्याच्या सरकार विषयी पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे मागील सरकारच्या काळात सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याबाबत पथदर्शक ठरलेली 'आपला दवाखाना' ही आरोग्य योजना पूर्ववत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई